आरती सत्यदेव बाबाची । दयाघन ब्रह्म स्वरुपाची ।

## क) परमहंस श्री संत शंकरबाबा महाराजांची आरती

आरती शंकरबाबा । दिव्य स्वरुपाची प्रभा ।।
दिपविले नवखंड । प्रकाशली सारी आभा ।।धृ.।।

पंचप्राण ओयाळीता । नुरले द्वैत भाव चित्ता ।।
अखंड ध्यास तुझा । कोणी न होय परता ।।१।।

ध्यानी ध्याता साक्षी माझा । तूची देही विदेही ।।
नादबिंदू जागवोनीया। तुज अंतर्गत पाही ।।२।।

चिन्मय रूप तुझे । ध्यानी दर्शन दावीले ।।
जागविले मजलागी । दावी कृपेच पाऊले ।।३।।

अनुभवी गुरु माझा । मज एकांताशी बोले ।।
अंतरंगी पाही आता । स्वानंदाची पाऊले ।।४।।

**सोहं मंत्र जागविता ।**
**अनुभव सिध्द झाले ।।**
**गुरू शिष्य एक भेटी । जीव शिव ऐक्य झाले ।।५।।**

**साक्षात्कार तयापूढे । ध्यानी मनी आदीरुपा ।**
**ज्योतीची निजज्योती । साक्ष साक्षी ब्रह्मरुपा ।।६।।**

**अनुभवी गुरु ऐसा ।**
**जगी जागवे स्वरूपा ।।**
**दास म्हणे याची छंदे । चुकवी चौऱ्यांशीच्या खेपा ।।७।।**
**आरती शंकर बाबा । दिव्य स्वरुपाची शोभा ।।**
**दिपविले नवखंड । प्रकाशली सारी आभा ।।धृ.।।**

## ७) नामधून

### अ) रघूपती राघव

रघूपती राघव राजा राम, पतित पाबन सिताराम ।।
ईश्वर अल्ला तेरे नाम । सबको सन्मती दे भगवान ।
जय बोलो सत् धर्मोकी । जय बोलो सत् कर्मोकी ।।
जय बोलो मानवताकी । जय बोलो सत् जनता की ।
जय बोलो सत्संतोंकी । जय बोलो सत् पंथोकी ।।
हम सब कष्ट उठायेंगे । सब मिलकर सुख पायेंगे ।
सब मिल सत् गुण गायेंगे । सब का जश फैलायेंगे।।
पिछडी कोई न जाती हो । सबकी सबपर प्रिती हो ।
देश धर्म मे निती हो । हम सत् के ही साथी हो।।

### ब) कृष्ण गोविंद

कृष्ण गोविंद, गोविंद नारायणा ।
शिवनारायणा, शिवपारायणा ।।धृ।।

गुरु आडकोजी नम: । गुरु लहानुजी नम:।
गुरु लहानुजी नम: । गुरु शंकरराय नम: ।
कृष्ण गोविंद, गोविंद, नारायणा ।।१।।

गुरु आडकोजी नमः। गुरु सत्यदेवाय नमः।
गुरु सत्यदेवाय नमः । गुरु शंकराय नमः।
कृष्ण गोविंद, गोविंद, नारायणा ।।२।।

गुरु आडकोजी नमः । गुरु तुकडोजी नमः।
गुरु तुकडोजी नमः । गुरु शंकरराय नमः ।
कृष्ण गोविंद, गोविंद, नारायणा ।।३।।

## ८) नामजप

अ) श्रीराम जयराम जय जय राम

ब) जयजय रामकृष्ण हरि / जयजय रामकृष्ण हरि

## ९) भाषण असल्यास सूचना द्यावी -

(प्रगटदिन महोत्सव आणि श्रीरामनवमी महोत्सव प्रसंगी केवळ)

## १०) पसायदान (प्रसाद वाटपासोबत)

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे। पसायदान हें ।।१।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवांचें ।।२।।

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतुया भूतां ।।४।।

चलां कल्पतरुंचे आरव। चेतना चिंतामणींचे गांव।
बोलते जे अर्णव पीयूषाचे ।।५।।

चंद्रमें जे अलांछन । मार्तण्ड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।

किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिही लोकी ।
भाजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।।८ ।।

तेथ म्हणे श्री विश्वेश्वरावो। हा होईल दान पसावो ।
येणें वरे ज्ञानदेवो। सुखिया झाला ।।९।।

## ११) शेवटचा विनवणी श्लोक

अ) सदायोग हा संत सेवा घडावा ।
सदा देह हा संत कार्यी पडावा ।
नको दूर लोटू तू बापा दयाळा ।
नमस्कार माझा श्री लहानुजी घननिळा ।।

ब) इस देवमें भी देव है, जो देवका परदेव है ।
अति सुक्ष्म से भी सुक्ष्मतर, वह मुल देव सदैव है।
जहातक है साक्षी-साक्षका,द्रष्यसहित त्रिपुटी महा ।
यह सब जहाँ पर है विलय, 'सत्यदेव' उसकोही कहा ॥

## १२) शांतिपाठ

अ) सर्वेऽत्र सुखिन: सन्तु, सर्वे सन्तु निरामया: ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित दु:खमाप्नुयात्।
ॐ शांतिः ! शांतिः !! शांति: !!!

भावार्थ : सर्व प्राणिमात्र सुखी होवोत. सर्व लोकांना आरोग्य लाभो. सर्वांचे कल्याण होवो. कुणासही दु:ख प्राप्त होऊ नये. आमच्या तिन्ही (आधिदैविक, आधि भौतिक आध्यात्मिक) तापांची शांती होवो.

## ब) शांतिपाठ

हरिॐ पूर्णमद: पूर्णमिदं पुर्णात् पुर्ण मुदच्यते ।
पुर्ण्यस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शांति ! शांति !! शांति !!!

१३) सूचना : शांतिपाठानंतर सर्वांनी सामुदायिक नमस्कार करुन जयघोषाकरीता उभे राहून त्रिवार जयघोष करावा.

त्रिवार जयघोष

श्री गुरुदेव की जय ! श्री गुरुदेवकी जय ।

।। बोलोजी श्री गुरुदेवकी जय ।।

श्री समर्थ आडकुजी महाराज की जय ।

श्री समर्थ लहानुजी महाराज की जय ।

श्री समर्थ सत्यदेव बाबा महाराज की जय ।

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज की जय ।

श्री संत बुधाजी महाराज की जय ।

श्री संत भागीरथी माता की जय ।

श्री समर्थ सद्गुरु शंकर बाबा महाराज की जय ।

सब संतन की जय ।

भारत माता की जय ।

सूचना : आजचा आपला सामुदायिक प्रार्थनेचा कार्यक्रम समाप्त झाला आहे. जाण्याकरिता उजवीकडून पाठीमागे वळावं आणि शांततेने चालू लागावं.

# ४) आरती विभाग ...

## १) आरती श्री मायबाईची

(तर्ज - श्रीमत् सद्गुरु स्वामी)

मायबाई ब्रह्मरुपिणी । ॐ जय जय गुरुमाता ।
नीरांजन करके रखते है, चरणोंमें माथा ॥ॐ॥टेक॥

निराकार जो आदिमाया, जगदुध्दारनको ।
मायबाई आर्वी में प्रकटी, धर्म प्रसारनको ॥ॐ॥१॥

सिताराम गुरुभक्त पति था, परमहंस पत्नी ।
पांडुरंग बालक हो पाया, प्रभूभक्त अवनी ॥ॐ॥२॥

कसार आडकु पलमे असार जाना जीवनको ।
ब्रह्मनिष्ठ वह आशिस दिया राष्ट्रसंतजीको ॥ॐ॥३॥

सत्यदेव, मोरेश्वर, लहानु, आप्पा, तात्याजी ।
जमनादास, झामसिंग, शंकर भगवत को राजी॥ॐ॥४॥

कौंडण्यपुरकी रुक्मिनी माता, योगीनी अवतारी ।
अच्युत उसकी परमकृपासे, भजता गिरीधारी ॥ॐ॥५॥

## २) आरतीश्री समर्थ आडकुजी महाराजांची

(चाल : आरती अंजनि तनयाची...)

आरती आडकुजी स्वामी । सुमंगल स्मरतचि गुणनामी ॥धृ. ॥

धन्य तव लिला वर्णविना । अल्पमति करितो दिन स्मरणा ।।
भक्तकल्पद्रुम गुण-धरणा । स्मरत निज काम क्रोध हरणा ।।
**(चाल) नम्र राहिल तव गुण गाया ।**
**करिशी भव तरण ! जनन हरि मरण ! दाउनी चरण !**
भ्रमण करावी आत्मारामी ।।सुमंगल०।।१ ।।
स्वरुप वर्णवे न निगमाला । मार्ग दावाया अवतरला ।।
भक्त निज करावया धाला । कासारा-गृही प्रगट झाला ।।
**(चाल) करुनिया नरतन निजधाम ।**
**प्रवासा सोड ! ब्घुनि धरि गोड ! गांव वरखेड !**
बेडि तोडोनि रमे प्रेमी ।। सुमंगल० ।।२ ।।
संशय-रहित वृत्ति धरुनी । स्थीर जाहले गुणा हरुनी ।।
विसर पाडिला सु-रसवदनी । नेत्र निज वैराग्ये-सदनी ।।
**(चाल) शोभती कुरळ केश माथा ।**
**अजानू मूर्ति ! पद्म पदि धरिती, दीना दे स्फूर्ति !**
कीर्ति गाताचि येइ कामी ।। सुमंगल० ।।३ ।।
धन्य वरखेड भाग्यवासी । प्रगटले जिथे अविनाशी ।।
सुखी जाहले बहू त्रासी । समाधी डुले सहज जैसी ।।
**(चाल) चढवुनी अलक्ष मुद्रेला ।**
**दास तुकड्यास ! नेई चरणास ! लावि तव आस !**
भास मज होई श्रीराम ।।सुमंगल०।।४ ।।

## ३) आरती वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची

आरती राष्ट्रसंता । जगद्गुरु कृपावंता ।
रोम-रोमी विश्वचिंता । योगियांच्या महंता ।।धृ.।।

ध्वज तू कळसावरी । सर्वात्मक गुरुदेवा ।
डोलले धर्म सारे । कैसै अपूर्व ती सेवा ।।१।।

धावत्या पाउलांनी । लाखो गावींच्या शिला।
चैतन्ये उठविल्या । धन्य तुझी दिव्य लीला ।।२।।

पाषाण अस्त्र केले । धर्मा दिली नवकांती ।
कैवल्य-माणिकाची । जिंकी काळासीहि शांती ।।३।।

गर्जती - 'ग्रामगीता' । वेधी विश्वचि खंजरी ।
समुदाय-जीवनाचा । स्वर्ग फुलाया भूवरी ।।४।।

समन्वय महाज्योती । तुकडोजी ब्रह्म-मूर्ती ।
'गुरुदास' लीन पायी । द्यावी आपुली स्फूर्ती ।।५।।

(रचियेता - सुदामजी सावरकर)

## ४) आरती 'माय-बापा'

(रचियेता - श्रीसंत शंकरबाबा महाराज)

**आरती मायबापा, भागिरथी माझी माता ।।**
बुधाजी नामे पिता, हरीली संसारची व्यथा ।।धृ. ।।

आरती मायबापा...

निर्मल अंतरीचा, शीव गौरविला साचा ।
दु:खी-सुखी समवासी, समता राखिली त्राता ॥१॥
आरती मायबापा...

व्रत वैकल्य जगी, कटाक्षे पाळीयेले ।
अन्न पाणी वाचोनिया, व्रता नित्य रुप झाले ॥२॥
आरती मायबापा...

शिव भोळा चक्रवर्ती, वर्णी गुण सदा चित्ती ।
प्रसन्न होऊनिया, जन्म झाला सगुण पंथी ॥३॥
आरती मायबापा...

सत्य वाचे सत्य नाम, सत्य स्वरुपाचे गुण ।
तुमचिये आशीर्वादे, लाभले सद्गुरु चरण ॥४॥
आरती मायबापा...

जाणे आडकोजीचे रुप, सद्गुरु लहानुजी नाथ ।
**सत्यदेव तुकडोजी,** झाले ब्रह्मस्वरुप ॥५॥
आरती मायबापा...

त्यांचीये चरणाचा, मज लाभला विसावा ।
पावन मी जगी झालो, स्वयंमेव जीवाभावा ॥६॥
आरती मायबापा...

**आरती** तुमची **हो,** उजळली अंतरी ।
प्रकाश थोर झाला, साठवेना अंबरी ॥७॥
आरती मायबापा...

हेतू हा मावळला, न ये बोलता बोली ।
सद्गुरुचे नि संगे, ऐसी आरती केली ॥८॥
आरती मायबापा...

**अष्टदळ भावांची, पुष्पे तुम्हां समर्पिली ।**
निजरुप स्वहिताची, सुता कृपा लाभली ॥९॥
आरती मायबापा...

५) **आरती श्री समर्थ लहानुजी महाराजांची**
(ध्वनी - आरती करो हरिहरकी)

आरती करो संतनकी, लहानुजी गुरुकी ।
प्यारे भगवनकी । आरती करो संतनकी ॥टेक॥

निकला सूरज पूर्व दिशामे । वैसे आये भाण्डे कुलमें ।
करके लीला विचित्र जगमे । शिव मूर्ति है प्रभु की ॥१॥

पंचतत्वका शाल दुशाला । चाँद सूरजका है उजियाला ।
सोऽहं की चलती है माला । रात-दिन जीवनकी ॥२॥

विदेह जिनकी मस्त स्थिती है । अंतर्मुखमें सदा मगन है ।
अजानूबाहु पद्मांकुश है । अलक्षमुद्रा जिनकी ॥३॥

आडकुजी! है तुम्हे सहारे। दीन दु:खीयोको तुने उध्दारे।
शुक्लाम्बर है वस्त्र तुम्हारा। चिन्मय झाँकी जिनकी।।४।।
इच्छित फल भक्तोने पाया। कितनो को भव पार लगाया।
बरखा कर दो शांति सुखोकी। होली दरिद्रताकी ।।५।।
भक्त काम कल्पद्रूम स्वामी। सहजासन में ब्रह्म पछानी।
'दास' तुम्हारा कुछना मांगे। आशा है दर्शनकी ।।६।।

– श्री रा. मो. बेलूरकर, ग्रामगीताचार्य

## ६) आरती श्री संत सत्यदेव बाबांची

**(तर्ज– आरती जय जगदीश्वरकी)**

आरती सत्यदेव बाबा की। दयाघन ब्रह्मस्वरुपजी की ।।टेक।।
तुम्ही हो सत्यस्वरूप का ग्यान। सदा स्वानंद मस्त है ध्यान।
वृत्ति है निर्वीकल्प विज्ञान। तुम्ही हो आतम ज्योतीमहान।।
**तर्ज-नशिले नयन झरे दिनरात। प्रेमकी सदा चले बरसात।।**
**बताकर सार।**
**दिया आधार।**
**किया भवपार।।**
बहायी सुखाधार निजकी। दयाघन ब्रह्मस्वरुपजीकी ।।१।।

सत्यही ईश्वर का है सार। विश्व को सत्य काही आधार।
तुम्ही हो दया शांति भंडार। किया है भक्तोंका उध्दार।

तर्ज- लगाते सहजासन चटमे । निरंजन माला चले घटमे ।।

मुखमे गुरुनाम।

रहते गुरुधाम ।

वृत्ती निष्काम ।

वाणी है अमर सत्य जीनकी । दयाघन ब्रह्मस्वरुपजीकी ।।२ ।।

सत्य-लहानुजी-तुकड्यादास । ब्रह्मरुप आडकुजीका दास ।।

आरती करता हूँ यह दास । पंच प्राणोका दीप-परकास ।

तर्ज- चिन्मय रूप पियारा है । तुम्हारा नाम उजारा है ।।

चरण के पास ।

रहे यह 'दास' ।

सदा यही आस ।

अर्जी है देवकी नंदनकी । दयाधन ब्रह्मस्वरुपजीकी ।।३।।

ॐ ॐ ॐ

## ७) आरती लहानुजी बाबांची

(चाल - आरती कुंजबिहारीकी)

आरती लहानुजी नाथाची । दयाघन दिव्य माऊलिची ।

जगी मज थोर दिसे तुचि । सतचित पूर्ण स्वरुपाची ।

ज्यावरी कृपा होई तुमची । सुखानंद दिसे स्वरुपाची ।

चाल -दिव्य असे साक्षी प्रभू तुचि । धरुनि आस चरणाची ।।
सोडुनि संसार ।
घेऊनि आधार ।
अंतरी झालो स्थिर ।

वेधले मानस तत्पद् स्वरुपाची । दयाघन दिव्य माऊलीची ।
आरती लहानुजी नाथाची। दयाघन दिव्य माऊलिची।।१।।

उपोषनी तुम्ही बैसविले । संकटातुनी रक्षण केले ।।
अक्कल डोंळा ज्ञान दिधले । समाधिसुख अनुभविले ।
नयनी तेज संचरिले । अंगी रोमांच दाटीयेले ।

चाल- कैवल्य रुप दावियेले । आपुल्या पदी बैसविले ।।
दावुनि चमत्कार ।
वृत्ति एकाकार ।
ब्रह्मानंदी स्थिर ।

भेट ती निजसुख स्वरुपाची । दयाघन दिव्य माऊली ।
आरती लहानुजी नाथाची । दयाघन दिव्य माऊलीची ।।२।।
अनहद् वाद्य वाजे अंबरी । ओळविले सत्राविचे तिरी ।
शब्देविन संवाद वैखरी । दुजेविन अनुवाद अंतरी ।।
स्वरुप प्रकटले सत्वरी । कृपेतव लहानुजी शिवहरी ।।३।।

चाल-पंचतत्वाचा करुनि गोळा । भयभय तुटती घननिळा ।।

दास गाइ गुण ।

तिन्ही लोकी पुर्ण ।

ब्रह्म सनातन

स्वानंद सुख पद पावलो निरंतरची ।

दयाघन दिव्य माऊलीची ।

आरती लहानुजीनाथाची।दयाघन दिव्य माऊलीची।।३।।

(श्री संत शंकर महाराज विरचित)

## ८) आरती प्रभू लहानुजींची

(चाल - घर आयो लक्ष्मण राम)

प्रभू ! न करी आता वेळ । दर्शन देई मला ।।धृ.।।

नाम तुझे पतीत पावन । सांगती वेद पुराण ।।
सत्यज्ञान तूं देशिल मजला। त्याविन जीव बेफाम ।।१।।

निर्भयकरी तनमन सारे । बुध्दी गाई गुणगान ।।
सदा तुमची सेवा करणें । देई हेचि वरदान ।।२।।

पाप,कपट,छल,खोटी ममता । यांचा करवी नाश ।।
तुझी निर्मख ज्योती माझ्या । हृदयी हो प्रकाश ।।३।।

जप, तप, साधना, करुनि सारे । योग, याग अनुष्ठान ।।
तुझिये स्वरुपा वाचुनि नाही। अन्य दुजा उपराम ।।४।।

सोऽहं मंत्रा समजुनी जीवा । करवि प्रेम समान ।।
प्रवृत्ति, निवृत्ती करोनी । एक जीब-शिव धाम ।।५।।
भोळी भक्ती घेई प्रभूजी । करवी प्रेम प्रदान ।।
'दास' तुझा मी करीतो आरती । सांडुनि देह गुमान ।।६।।
(श्री संत शंकर महाराज विरचित)

## ९) आरती लहानुजी नाथाची

(चाल – आरती ज्ञानराजा)

जय लहानुजी नाथा । महाराजा समर्था ।।
त्रिभुवनी तूची थोर । जगद्गुरु जगन्नाथा ।।धृ।।

लहानुजी नाम सार । वेद शास्त्रांचा आधार ।
संसार दु:ख नासे । मिळता चरणीचे रज ।।१।।

लहानुजी नाम घेता । सौख्य लाभले चित्ता ।
काय वर्णू तुझे गुण । थकले शेषही गाता ।।२।।

तू कृपेचा सागर । करी कृपा आम्हावर ।
'दास' तूझा विनवितो । लीन होवूनी चरणावर ।।३ ।।

जय लहानुजी नाथा । महाराजा समर्था ।
त्रिभुवनी तूची थोर । जगद्गुरु जगन्नाथा ।।धृ.।।

(श्री संत शंकर महाराज विरचित)

## १०) आरती स्वामी सत्यस्वरुपाची

(चाल – आरती ज्ञानराजा)

आरती ज्ञानरुपा । स्वामी सत्यस्वरुपा ।
कैवल्य रुप तुझे । सद्गुरु ब्रह्मरुपा ।।धृ.।।

मुळ मंत्र सोहं वाचे । जीव-शिव रुप साचे ।।
निजरुप दृष्टीपुढे । भावे वर्णू त्या अनंता ।।१।।

सत्‌चित्तानंदा । निजधामा सुखकंदा ।।
नेति,नेति शब्द वाचे । वेदा मौन त्या स्वरुपा ।।२।।

सोऽहं ब्रह्म हेचि खुण । अनुभविता स्वयंपुर्ण ।।
ऋषी, मुनी सनातन । हेचि नित्य घ्याती अजपा ।।३।।

तुचि सत्यरुप भरीलासी । लोकी, देही, विदेही ।
गुरु, शिष्य एक भेटी । साक्षी साक्ष आदिरुपा ।।४।।

अनहद वाद्य नादे । वृत्ति अंतर्मुख राही ।।
संदेह सांडोनिया । 'दास' पावे त्या स्वरूपा ।।५।।

(श्री संत शंकर महाराज विरचित)

## ११) धुप आरती

सत्‌चित आनंदा, आत्मारामा, सुखकंदा ।
जयदेवा ! जय ब्रह्मस्वरुपा ! श्रीसद्गुरुनाथा ।।

आरती ओवाळुनी तवचरणी, ठेवितसे माथा ॥धृ.॥

चंद्र मंडलांतर्गत निर्मळ, ब्रह्मरंध्रभुवनी ।
एकविस स्वर्गावरती आसन, साजे कुंजवनी ॥१॥

सहस्त्रदल पंकजी विराजित, गुंफे माझारी ।
अतसिकुसुमसम कांति झळके, शुक्लांबरधारी ॥२॥

षडचक्रांचे देव वंदिले, तीर्थाटन झाले ।
द्विदल पंढरपुरी सद्‌गुरु, पाहुनि मन घाले ॥३॥

सद्रूप-चिद्रूप आनंदात्मा, सज्जन दीनबंधू ।
करुणासागर पूर्ण उजागर, तारक भवसिंधू ॥४॥

प्राणापाने सोऽहं सूत्रे, काया-वाणी मने ।
त्रिगुण ताटी प्रसाद अर्पण, केलासे सुमने ॥५॥

रत्नजडित-सिंहासन लखलख, रंग-रंग भरिले ।
चिन्मय मूर्ति ध्यान गुरुचे, सोज्वळ मनि धरिले ॥६॥

श्रवण-पठन या प्रदक्षिणेने, गुरुश्वरदेश्वरिला ।
निजध्यासिता ज्ञानदीपाचा, प्रकाश संचरला ॥७॥

अनहद, वेणू, शंख, झांजरी, घागरिया वाजे ।
मृदंग-वीणा-टाळ-नगारा, गगनांबरी गाजे ॥८॥

गीता-मंत्र-पुष्पांजलि वाहू, गुरुपद अरविंदा ।
प्रसाद-तीर्था 'सिंघ' सेवुनि, पावे आनंदा ॥९॥
सत्‌चित आनंदा आत्मारामा सुखकंदा ।

रचियेता- झामसिंघ महाराज, आर्वी

## १२) आरती सद्‌गुरुची

ओवाळा ओवाळा माझ्या सावळ्या राणा ।
माझ्या सद्‌गुरुराणा ।
पाचाही तत्वाच्या ज्योति लाविल्या जाणा ॥धृ.॥

निराकार वस्तु कैसी आकारा आली ।
सर्वांघटी व्यापक माझी सद्‌गुरु माऊली ॥१॥

सोळा सांधे बाहात्तर कोठड्या, काया रचीली ।
नऊ खिडक्याचा रथ, आत मूर्ति बैसविली ॥२॥

सप्तहि सागराचा वेढा कैसा घातला ।
तुका म्हणे बाप माझा कनवाळू आला ॥३॥

## १३) आरती श्रीरामाची

(चाल - जय जय सद्‌गुरु दिनदयाळा)

**घर आयो लक्ष्मणराम, पूरी में आनंद भयो ॥धृ.॥**

माता कौशल्या पुछने लागी,
कहो लंकाकी बात, रामजी कहो लंकाकी बात ।

कितने दिन में रावण मारा, कितने दिन में रावण मारा ।।
सिता लाई संगात, पुरी में आनंद भयो ।।१ ।।
**घर आयो लक्ष्मणराम ... पुरी मे आनंद भयो ।**

पुरी मारग में तीन वृक्ष है, दोन निमडा, एक आम, रामजी दो निमडा एक आम ।
उसके नीचे प्रभूजी बैठे, उनके नीचे प्रभूजी बैठे ।
रघुपती राघव राम, पुरी में आनंद भयो ।।२ ।।
**घर आयो लक्ष्मणराम ... पुरी मे आनंद भयो ।**

आठ घाट लक्ष्मणने रोके, शेष रोके भगवान ।
रामजी शेष रोके भगवान ।
दश दरवाजे अंगदने रोके, दश दरवाजे अंगद ने रोके ।
कुद पडे हनुमान, पुरी में आनंद भयो ।।३ ।।
**घर आयो लक्ष्मणराम ... पुरी मे आनंद भयो ।**

घर घर गोबर आंगन लिपायो,मोतीयोने चौक पुराय।
रामजी मोतीयोने चौक पुराय ।
माता कौशल्या करे आरती, माता कौशल्या करे आरती ।
तुलसीदास प्रभु गुण गाय, पुरी में आनंद भयो ।।४ ।।
**घर आयो लक्ष्मणराम ... पुरी मे आनंद भयो ।**

## १४) आरती तुळशी मातेची

जयदेवी, जयदेवी जय माये तुळशी ।
निज पत्राहुनि लघुत्तर त्रिभुवन हे तुळशी ।।धृ।।

ब्रह्मा केवळ मूळी मध्ये तो माते शौरी ।
अग्री शंकर पिंडे, शाखा परिवारी ।।
सेवा करिती भावे सकळही नरनारी ।
दर्शन मात्रे पापे हरती निर्धारी ।।१।।
जयदेवी-जयदेवी........

शीतल छाया भूतल व्यापक तु माते कैसी ।
मंजीरीची आवड कमळापती रमणाशी ।।
तव दलविरहीत राहे विष्णू उपवाशी ।
विशेष महिमा तुझा शुभ कार्तिक मासी ।।२ ।।
जयदेवी-जयदेवी........

अच्च्युत माधव केशव पितांबरधारी ।
तुझे पुजन काळी जो हे उच्चारी ।।
तयाशी देशी संतती-संपत्ती सुखकारी ।
गोसावी सुत विनवी मजला तू तारी ।।३।।
जयदेवी-जयदेवी........

## १५) आरती श्रीकृष्णाची

**आरती मनोभावे । गोपाल कृष्णाची ।**
**मंगल गाती गोपी । निज सुख प्राप्तीची ।।धृ।।**
कालीया फणीवरी । नृत्यकरी मुरारी ।
गोपाल जगज्जीवना । मंजूळ वाजाविती वेणू ।
नटनाट रंग ज्याचा । प्रिया गोपिका रमणू ।।१।।
**आरती मनोभावे.............**

सुगंध अक्षतेचा । मळवट रेखियला ।
मृदुलेप सर्वा अंगी । स्वर्ण तेज झळकीला ।
पाहावया गोपिराजा । थोर सुमदाय जाहला ।।२।।
**आरती मनोभावे.............**

कनकाचे ताट करी । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबर हो । साम गायन करी ।।३।।
**आरती मनोभावे.............**

जय देवादि वेद गर्जे । भाव सुफळ जाहला ।
आनंद सोठवेना । गोपि आणि गोपाळा ।
वदली व्यास वाणी । ऐसी माधवी लीला ।।४।।
**आरती मनोभावे.............**

विनविती दास तुझा । एका जनार्दनी देखा ।

देखिली कृष्णमूर्ति । तेणे पावलो सूखा ।।५।।

**आरती मनोभावे............**

**१६) आरती श्री मारुतीची**

जय देवा हनुमंता । जय अंजनीसुता ।
ॐ नमो देव देवा । राया रामाच्या दूता ।
आरती ओवाळीतो । ब्रह्मचारी पवित्रा ।
**जय देवा हनुमंता ।।धृ।।**

वानर रुपधारी । ज्याची अंजनी माता ।
हिंडता वनांतरी । भेट झाली रघुनाथा ।
धन्यतो रामभक्त । ज्याने मांडिली कथा ।
**जय देवा हनुमंता ।।१।।**

सीतेच्या शोधासाठी । रामे दिधली आज्ञा ।
उल्लंघूनी समुद्रतीर । गेला लंकेच्या भूवना ।
शोधूनी अशोकवना । मुद्रा टाकिली खुणा ।
**जय देवा हनुमंता ।।२।।**

सीतेसी दंडवत । दोन्ही कर जोडून ।
वन हे विध्वंसिले । मारिला अखिया दारुण ।
परतोनी लंकेवरी । केले लंकेचे दहन ।
**जय देवा हनुमंता ।।३।।**

निजबळे इंद्रजित । होमकरी आपण ।
तोही त्वा विध्वंसिला । लघूशंका करुन ।
देखोनी पळताती । महाभूते दारुण ।
जय देवा हनुमंता ।।४।।

राम हो लक्ष्मण । जरी पाताळी नेले ।
तयाच्या शोधासाठी । जळी प्रवेश केले ।
अहिरावण-महिरावण । क्षणामाजि मर्दिले ।
जय देवा हनुमंता ।।५।।

देऊन भुभु:कार । नरलोक आटीले ।
दीनानाथा माहेरा त्वा । स्वामिसी सोडविले ।
घेऊनी स्वामी खांदी । अयोध्येसी आणिले ।
जय देवा हनुमंता ।।६।।

हनुमंता नाम तुझें । किती वर्णू दातारा ।
अससी सर्वांठायी । घरोघरी अम्बरा ।
एका जनार्दनी । मुक्त झालो संसारा ।
जय देवा हनुमंता ।।७।।

## १७) श्री भगवान पांडुरंगाची संपूर्ण आरती

(सूचना: महाराष्ट्रामध्ये श्री पांडुरंगाची आरती आप आपल्या परिपाठाप्रमाणे तीन किंवा चार किंवा पाच कडव्यांची म्हटली जाते. आपण आपल्या आवडी प्रमाणे म्हणावी. सर्वांच्या सोईसाठी संपूर्ण आरती देत आहोत.)

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा । चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।१ ।।

**जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रुखमाई वल्लभा राहीच्या वल्लभा पावे जिवलगा ।।धृ ।।**

तुळशी माळा गळा कर ठेवुनी कटी । कासे पिंताबर कस्तुरी लल्लाटी । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढे उभे राहती ।। जयदेव जयदेव ।।२।।

धन्य वेणू नाद अनुक्षेत्रपाळा । सुवर्णाची कमळे वनमाळा गळां । राही रुख्माबाई राणीया सकळा । ओंवाळीती राजा विठोबा सावळा ।। जयदेव जयदेव ।।३ ।।

ओवाळू आरत्या कुरवंड्या येती । चंद्रभागेमाजीं सोडुनिया देती । दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जयदेव जयदेव ।।४ ।।

आषाढी कार्तिकी भक्त जन येती । चंद्रभागेमाजी स्नाने जे करिती । दर्शन हेळामात्रे तयां होऊ मुक्ति । केशवासी नामदेव, माधवासी नामदेव, भावे ओवाळिती ॥

जयदेव जयदेव ॥५॥

## १८) आरती भगवान शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
विषे कंठी काळा त्रिनेत्री ज्वाला ।
लावण्य सुंदर मस्तकी बाळा
तेथूनीया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ॥१॥

जय देव जय देव जय शिवशंकरा
आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ॥धृ॥

कपुर्र गौरा भोळा नयनी विशाळा ।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभुतीचे उधळण शितिकंठ निळा ।
ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा ।।२॥

जय देव जय देव जय शिवशंकरा
आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ।

देवी दैत्यी सागर मंथन पै केले ।
त्यामाजी अवचित हलाहल उठिले ।

ते त्वा असुरपणे प्राशन केले ।
नीलकंठ नाम प्रसिध्द झाले ।।३ ।।

**जय देव जय देव जय शिवशंकरा**
**आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ।**

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनीजन सुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी ।
रघुकुल तिळक रामदासा अंतरी ।।४।।

**जय देव जय देव जय शिवशंकरा**
**आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ।**



# ५) मंत्र पुष्पांजली व शांतिपाठ विभाग ...

(आरती नंतर म्हणावे)

१अ)ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तनि धर्माणि प्रथमान्यासन्।
तेह नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा : ॥१॥
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयंवैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् काम कामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु ॥२॥
कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नम:।
ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वराज्यं वैराज्यं
पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्याईस्यात्
सार्वभौम: सर्वायुष ।
आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति ॥३॥
तदप्यैष: श्लोकोभिगीतो मरुत: परिवेष्टरो मरुतस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेविर्श्वेदेवा: सभासद इति ॥४॥
एकदंतायविघ्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नोदंती प्रचोदयात्।
॥ मंत्रपुष्पांजली समर्पयामि ॥

ब ) या ते या तुलसी पत्र पुष्पमाला ।
या पंचमाला । सहजा कृपाला, अंबिके यात्रा ।
रुख्मिणी वदंते । द्वारके राजा जय कृष्णदेवा ।
मंत्र पुष्पांजली समर्पयामी, नमस्कारोमिच नमस्करोमि।

क) असितगिरी समंस्यातकज्जलं सिंधुपात्रे ।
सुरतरुवर शाखा, लेखनी पत्रमुर्वी ।।
लिखति यदि गृहित्वा, शारदा सर्वकालम् ।
तदपि तवगुणांनामीश पारं न याति ।।

ड) घालिन लोटांगण, वंदिन चरण, डोळ्याने पाहिन रुपतुझे
प्रेमे आलिंगन, आनंदे पुजीन, भावे ओवाळीन म्हणे नामा ।।१।।

त्वमेव माताच् पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखात्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्व ममदेव देव ।।२।।

कायेन वाचा मनसेनन्द्रियैर्वा, बुध्दयात्मना वा प्रकृति स्वभावात।
करोमी यद्यत् संकलं परस्मै, नारायणायेति समर्पयामी ।।३।।

अच्युतम्,केशवं, रामनारायणं, कृष्णदामोदरं वासुदेवहरिम् ।
श्रीधरं, माधवं, गोपिका वल्लभं, जानकी नायकं, रामचंद्र भजे ।।४।।

इ) कर्पूरगौरं, करुणावतारं । संसार सारं भूजगेंद्र हारम् ।
सदावसंत हृदयारविंदे । भवंभवामी सहितं नमामी ।
मंदारमाला कुलितालकाय कपाल माला दिवसे कराय ।
दिव्यांबरायै दिगांबराय । नमः शिवाययैच नमः शिवाय ।

फ) हरे राम, हरे राम, राम-राम हरे हरे ।
हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।
पुंडलिक वरदा हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव, तुकाराम ।
जनार्दन, एकनाथ महाराज की जय ।

## २) शांतिपाठ

**ॐ सहनाववतु । सहनौ भुनक्तु ।**
**सहवीर्य करवावहै ॥**
**तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहे ॥**
**ॐ शांतिः! शांतिः!! शांतिः!!!**

## ३) विनवणी

श्री अनंता मधुसुदना । पद्मनाभा नारायणा ।
जगत व्यापका जनार्दना । आनंदघना, अविनाशा ॥१॥

सकळ देवाधिदेवा । कृपाळू बा जी केशवा ।
महानंदा महानुभवा ! सदाशिवा, सहजरुपा ॥२॥

चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा ।
सहस्त्रपादा सहस्त्रकरा । क्षिरसागरा, शेष शयना ॥३॥

कमलनयना,कमलापति । कामिनी मोहना, मदनपूर्ती ।
भवतारका, धरित्या क्षिती । वामनमूर्ती त्रिविक्रमा ॥४॥

अगा ये सगुणा-निर्गुणा । जगज्जनित्या, जगत्ज्जीवना ।
वसुदेव, देवकी नंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ॥५॥

तुका आला लोटांगणी । मज ठाव द्यावाजी चरणी ।
हिच करितसे विनवणी । भवबंधनी सोडवावे ॥६॥

## ४) मागणे

मागणे एक तुजप्रती आहे । देशीलतरी पाहे पांडुरंगा ॥१॥
यासंताशी निरवी हेच मज देई ।
आणिक दूजे काही न मागू देवा ॥२॥
तुका म्हणे आता उदार तु होई ।
मज ठेवी पायी संताचिया ॥३॥



# ५) जयघोष

अ) अनंत कोटी, ब्रह्मांड नायक,
महाराजाधीराज, योगीराज,
श्री लहानुजी महाराज अनुग्रहीत,
श्री सत्यदेव बाबा कृपांकित,
भक्तवत्सल, संकटमोचन,
परब्रह्म, परमहंस, पिंपळखुटा निवासी
समर्थ सद्‌गुरु, माऊली
श्रीसंत शंकरबाबा महाराज की जय ।।

## जयघोष

**ब) श्री समर्थ सद्‌गुरु लहानुजी, सत्यदेवबाबा कृपांकित,
पिंपळखुटा निवासी, मंगलदायी, विघ्नविनाशी,
भक्त भुषण, भागीरथी नंदन ।
श्री सद्‌गुरु शंकरबाबा महाराज की जय ।**

शब्दरचना - श्री.बाबाराव गेडाम (संतदास)

## ६) मंगलाष्टके विभाग ...

१) झाले सज्जची हे वधू-वर अता, लग्नास या मंडपी ।
आला सर्व धर्म समाज मोह धरुनी, कर्ते पुढारी तयी ॥
देशाच्या घटका तुला स्मरण हे, देतात उत्साहूनी ।
घेई नित्य व्रता सुकिर्ती करण्या होई गृहस्थाश्रमी ॥
राष्ट्राच्या सुख सोईला मदत ही, कार्यार्थ आली तुला ।
आहे तो गुरुदेव साह्य अपुला,
कुर्यात् सदा मंगल ॥१॥

२) दोघे मित्र बनोनी प्रिय अपुल्या, भुदेवतेला स्मरा ।
देशाचे भवितव्य उज्वल करा, जातीयता ही हरा ॥
बोला 'मानवधर्म एक अपुला', ना अन्यथा भावना ।
नांदा धोरण हेच ठेवूनि पुढे, सांगा जना सज्जना ॥
घ्या हे बंधन बांधुनी वर-वधु, उध्दारावयासी कुला ।
चिंता तो मनी पुज्य गांधी अपुला,
कुर्यात् सदा मंगलम् ॥२॥

३) बाळे! आश्रय हा तुला सततचा, विश्वास घे यापरी।
साक्षी ठेवूनिया प्रभुस अपुल्या, सेवा मिळूनी करी ॥

आले भाग्य तुझे पुढे म्हणूनिया, हा जोड देवापरी ।
झाला प्राप्त तुला, प्रसन्न हृदये, राहील जन्मांतरी ।।
नांदा सुंदर जोडपे मिळूनिया, सत्कार्य साधा घरी ।
सेवा मंडळ वादू द्या व्दय-करी,
कुर्यात् सदा मंगलम् ।।३।।

४) मित्रा ! घे वचनास या समजुनी, तू पोर नाही अता।
आली एक जबाबदारी तुजला, घे एक पत्नीव्रता ।।
ज्याने देश तुला तुझाच भुषवी, ती वाढवी तू प्रथा।
जैसे राम-सिता, सती, अनुसया, अत्री तसे व्हा स्वतः।।
भोगासाठीच लग्न हे नसुनिया, आदर्श मानव्यता ।
दावा आचरुनी अशी सुरकथा,
कुर्यात् सदा मंगलम् ।

५) साधुसंत, वडील, प्रेमीजन, हे नेते, पुढारी इथे ।
तुकड्यादास म्हणे असे शुभघडी, दोघाचिया संमते ।।
नांदा सुंदर जोडपे म्हणुनिया, सत्कार्य साधावया ।
घाला माळ तशी परस्पर गळा, कुर्यात् सदा मंगलम् ।

(वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज)

(श्रीसंत शंकर महाराज विरचित)

६) यावे श्री गणनायका, गजमुखा । लग्नाशी या मंडपी।
ब्रह्मा, विष्णु, महेश्वरा, गुरुवरा । अत्री, अनुसया तपी ।
लक्ष्मी,पार्वती, सावित्री, सरस्वती । पांडूरंग-रुख्मिणी ।
ऋषी-मुनीगण, गण गंधर्व, सर्वही । राम-सिता, नंदिनी ।
साक्ष ठेवूनिया तुम्हास सकला । वंदुनिया मंडपी ।
दास म्हणे झाले प्राप्त तुम्हा प्रसन्न हृदयी ।
कुर्यात् सदा मंगलम् ।

७) यावे नवनाथादी सर्वही अता । ज्ञानेश्वर माऊली ।
श्री निवृत्ती, सोपान, मुक्ताई ईथे । आशिष देण्या भली।
मायबाई, आडकूजी परमहंस येथे । येवूनिया चिंतनी ।
श्री राष्ट्रसंत तुकडोजी वंदिता । उपस्थित हो पावनी ।
दास म्हणे शुभाशीर्वाद फळण्यां वधू-वरा।
कुर्यात् सदा मंगलम् ।

८) दोघेही वचनास पाळूनी अता । नाभिन्न व्हावे कधी।
पूर्ण आयुष्य जावो सुदृढपणे । अप्रेमे न होता कधी।
सेत्राची घन मिळे जसे जीवनी । मान्य तो दोघासही।
हेचि हक्क तुम्हा स्फुरे उभयता । दैती स्मृती संत ही।।

पुढे सत्य असाची पुत्र निपजो । जो स्वधर्मी शोभला।
दास म्हणे आशीर्वाद तुम्हा उभयता ।
कुर्यात् सदा मंगलम् ।।

९) आले मंगल स्थळी वधू-वर ते । सत्कामना घेवूनी ।
दोघेही सुखी-असा प्रेमे मिळोनी । संसार श्रमातूनी ।
वाढो धन-धान्य सुरम्य सदनी । मांगल्य ज्यांचे घरी ।
येता सज्जन, थोर, मान्य अतिथी । सत्कार त्यांचा करी ।।
दास म्हणे नांदा सुंदर जोडपे मिळूनिया ।
कुर्यात् सदा मंगलम् ।।

१०) आली लग्न घटी समीप नवरा । लग्नाचिया मंडपी।
सर्व समाज मेड धरुनी बसले । अक्षदा उघळती ।।
वागा आता दोघेही प्रेमे मिळूनी । आशीर्वादे अर्पिती ।
अग्नी तुम्हा समोर साक्ष ठेवूनी । विश्वास देण्यापरी ।
साधूसंत तुम्हा वरदान देण्या । आदर्श दावा परी ।
दास म्हणे प्रेमे एकमते जीवन भूषवी ।
कुर्यात् सदा मंगलम् ।।
वधूवर्यो शुभं भवतू सावधान।

## ७) वैदिक प्रार्थना

अ) हरि: ॐ ।

ईशावास्यम् इदम् सर्वम् ।
यत् किंच जगत्यां जगत् ।
यत् त्यक्तेन भुंजीथा:
मा गृध: कस्यस्विध्दनम ॥ १॥

ईशोपनिषद

ब) ॐ असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्माऽअमृतंगमय ॥
ॐ शांति ! शांति ! शांति !!!

॥ॐ॥

## ८) राष्ट्रवंदना

(तर्ज : जन-गन-मन अधिनायक)

तन-मन-धन से सदा सुखी हो, भारत देश हमारा ।
सभी धर्म अरु पंथ पक्ष को, दिल से रहे पियारा ।।
विजयी हो,विजयी हो,विजयी हो,भारत देश हमारा ।।टेक।।

निर्भय हो यह देश की माता, मंगल किर्ती कराने ।
सत्य-शील अरु निर्मल मन से, वीरो को उपजाने ।।
सद्‌गुणी हो यह देश की जनता, जीवन सुख सजवाने ।
रंक-राव-पंडीत-भिकारी, सबको सुख दिलवाने ।।
विजयी हो!विजयी हो!विजयी हो!भारत देश हमारा ।।१।।

स्पृश्यास्पृश्य हटे यह सारा, देश-कलंक मिटाने ।
सबके मन कर्तव्यशिल हो, धन-उद्योग बढाने ।।
सबका हो विश्वास प्रभू पर, अपनी शक्ती बढाने ।।
ब्रह्मचर्य, अध्यात्म, दैविगुण घर घर में प्रगटाने ।
सारा भारत रहे सिपाही, शत्रू को दहशाने ।
तुकड्यादास कहे स्फूर्ति हो, सबको भक्ती कराने ।।
विजयी हो!विजयी हो!विजयी हो!भारत देश हमारा ।।२।।

रचियता - वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज